**संच : ब**

# शिक्षकांसाठी सूचना      चौथी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७-१८

**इयत्ता - चौथी**

**विषय : मराठी**

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना**      **एकूण गुण : ३०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट :** जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) वादळ | २) पर्वत |
| ३) दिवाळी | ४) पवित्र |
| ५) खुराक | ६) फक्कड |
| ७) वैरण | ८) संगीत |
| ९) पासष्ट | १०) फॉल |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'पर्वत' ऐवजी 'परवत' किंवा 'दिवाळी' ऐवजी 'दीवाळी'/ शीकारि असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४) हा उतारा वाच आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न २) क)** घोकंपट्टीचा (गुण १)

**प्रश्न ३)** इंग्लंडमध्ये. त्यांनी तिथे छपाईक्षेत्रात जास्त शोध लावले. (गुण २)

**प्रश्न ४)** शास्त्रीय प्रवृत्ती/प्रयोग करण्याची आवड, वैज्ञानिक दृष्टीकोन या अर्थाचे उत्तर बरोबर द्यावे. (गुण २)



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Teacher Instruction \1) Std 4th \Proof-II\19-06-17\V/S

## संच : ब

**प्रश्न ५ ते ७) खालील जाहिरात वाच आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न ५)** **ब)** पुस्तक (गुण १)

**प्रश्न ६)** होय. प्रत्येक पुस्तकावर ५०% ची सूट. (गुण २)

**प्रश्न ७)** आजोबांना बालसाहित्य जत्रेसाठी जाता येईल. सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य. (गुण २)
(होय लिहिल्यास १ गुण द्यावा./वाक्य लिहील्यास १ गुण.)

**प्रश्न ८ ते १२) शब्दसंपत्ती आणि व्याकरणावर आधारित प्रश्न.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न ८)** आईने बनवलेले जेवण अगदी चवदार होते. (गुण १)

**प्रश्न ९)** फारूख कधीही खोटे बोलत नाही. (गुण १)

**प्रश्न १०)** झऱ्यातले पाणी खळखळ वाहत होते. (गुण १)

**प्रश्न ११)** जंगलात हरणांचा कळप सुंदर दिसत होता. (गुण १)

**प्रश्न १२)** अगं, चित्र दाखवतेस ना? (गुण १)
(अगं, या शब्दानंतर स्वल्पविराम व दाखवतेस ना? या शब्दानंतर प्रश्नचिन्ह दिल्यास प्रत्येकी अर्धा याप्रमाणे एक गुण.)

**प्रश्न १३ ) खालील चित्र पहा आणि त्यावर गोष्ट लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखी)

**उद्दिष्ट :** मुलांची अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** लेखन नियमांनुसार चुकल्यास गुण कमी करू नये. (प्रमाण भाषेची अपेक्षा करू नये.)

| गुण | निकष |
|---|---|
| ० | केवळ शब्द लिहिणे किंवा काहीही न लिहिणे. |
| १ | यांत्रिकरित्या एकच वाक्य शब्द बदलून लिहिणे किंवा सुसंगत नसणारे विस्कळीत लेखन. |
| २ | त्रोटक किंवा अर्ध्यामुर्ध्या शब्दांतील लेखन. वाक्यरचना काही ठिकाणी तरी नीट आहे. |
| ३ | संपूर्ण चित्राचा एकत्र विचार करून सलगपणे केलेले अर्थपूर्ण लेखन. पण गोष्ट असेल असे नाही. |
| ४ | चित्राच्या तपशिलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. |
| ५ | चित्राच्या तपशिलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. पात्रांच्या तोंडी संवाद/बोलणे घातले आहे. |

# संच : ब

**प्रश्न १४) खाली एका गोष्टीची सुरुवात दिली आहे ती गोष्ट पूर्ण कर.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्‌दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** प्रमाण भाषेचा वापर अपेक्षित नाही.

| गुण | निकष |
|---|---|
| ० | गोष्टीच्या सुरुवातीचा विचार न करता केलेले असंबद्ध लिखाण |
| १ | गोष्टीच्या सुरुवातीचा संदर्भ घेऊन वर्णन करण्याचा प्रयत्न. वाक्यरचना नीट नाही त्यामुळे संपूर्ण अर्थबोध नाही. |
| २ | पूर्ण वाक्यांत आणि दिलेल्या शब्दांशी संबंधित पण त्रोटक (एक किंवा दोन वाक्यांत) अभिव्यक्ती. |
| ३ | गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र लिखाणात फारसे नियोजन केलेले नाही. त्यामुळे लेखन विस्कळीत वाटते. |
| ४ | गोष्टीला सुसंगत मध्य आणि शेवट आहे. मात्र एकूण गोष्ट त्रोटक आहे. पात्रे, संवाद, भूमिका यांचा फारसा विचार केलेला नाही. |
| ५ | गोष्टीची सुरुवात लक्षात घेऊन सुसंगत मध्य आणि शेवट आहे. गोष्ट खुलवण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका/संवाद दिलेले आहेत. |

**संच : ब**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :** मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी काही प्रश्न विचारणार आहे. त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

**रोझी दुपारी शाळेतून घरी आली. आई-बाबा लग्नाला गेले होते. रोझीने कुलूप उघडले. घरात येऊन तिने कपडे बदलले, हातपाय धुतले व आईने ठेवलेला खाऊ खाल्ला. थोड्याच वेळात ढग दाटून आले. वीजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटाने रोझीला भीती वाटू लागली. तिने पटकन दारे-खिडक्या बंद केल्या.**

**बाहेर पडत असणाऱ्या पावसावर तिने छान कविता तयार केली. तयार कविता ती गुणगुणू लागली. तेवढ्यात दारावरची बेल वाजली. रोझीने दार उघडले. समोर आई-बाबांना पाहून तिची भीती दूर पळाली.**



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Teacher Instruction \1) Std 4th \Proof-II\19-06-17\V/S*

## संच : ब

**वाचनासाठी गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही, वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

**गुण** **योग्य उत्तर**

**तोंडी प्रश्न २) रोझीचे आई-बाबा कोठे गेले होते?** (१) (क)

अ) बाजारात

ब) गावाला

क) लग्नाला

**तोंडी प्रश्न ३) रोझीला भीती का वाटू लागली?** (२) (ब)

अ) ती घरी एकटी असल्यामुळे.

ब) वीज व ढगांच्या आवाजाने.

क) घरातील वीज गेल्यामुळे.

**तोंडी प्रश्न ४) रोझीला कोणत्या गोष्टीचा छंद असावा? उताऱ्यातील कोणत्या वाक्यावरून तुला हे समजले?** (२)

(कवितेचा. बाहेर पडत असलेल्या पावसावर तिने छान कविता तयार केली.)

■■■



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Teacher Instruction \1) Std 4th \Proof-II\19-06-17\V/S*